# माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात नाती जपणे महत्वाचे प्रा. डॉ. विश्वाधार देशमुख

## देगलूर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मोबाईल, इंटरनेट व सोशियल मिडीयाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर संवाद साधने सुलभ झाले आहे मात्र माणसा माणसातील संवाद दुरावत चालला आहे. यासाठी एकमेकांशी नाते जोडणे व जपणे आवश्यक झाले आहे,असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विश्वाधार देशमुख यांनी व्यक्त केले. ते देगलूर महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते. व्यासपीठावर



प्रमुख पाहुणे देगलूर विधानसभा मतदार संघाचे आमदार जितेश अंतापुरकर, अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार , कोषाध्यक्ष विलास तोटावार , संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र बालाजीराव मोतेवार , रविंद्र अप्पा द्याडे, विजय उनग्रतवार , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, अनिल पाटील खानापुरकर, अशोक साखरे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा. गौतम भालेकर व प्रकाश सोनकांबळे यानी स्वागत गीत गाऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्रा डॉ संजय पाटील यांनी केले . वार्षिक स्नेहसंमेलन हे प्रत्येक तरुण व तरुणींच्या जीवनातील अविस्मरणीय काळ असतो. कला , साहित्य, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या माध्यमातून सुप्त कला गुणांना विकसित करण्याची सुवर्ण संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होत असते ,असे प्रतिपादन देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , डॉ.व्ही .जी. शेरीकर , पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी, , प्रशांत दासरवाड, संतोष पाटील , बालाजी पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी , विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ राजेश्वर दुडूकनाळे तर आभार उपप्राचार्य एम. एम. चामकुडे यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner